**प्रेसनोट** **दिनांक ३०/०३/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## विधीसंघर्षीत बालक यांचेकडुन ३ चोरीचे गुन्हे उघडकिस आणुन त्यांचे ताब्यातुन रुपये ८५,०००/- च्या मोटार सायकली हस्तगत केल्या

दिनांक २७/०३/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे हिरो होंडा फॅशन मोटार सायकल ही चोरीला गेल्याचा गुन्हा रजि नंबर १६०/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९ गुन्हा दाखल झालेने तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व त्यांचा स्टाफ राहुल मोरे, संजय आढारी, विशाल गाडे, विष्णु गोणे, विनोद महाजन, प्रशांत कापुरे, पुषेद्र चव्हाण असे लोहगांव भागामध्ये पेट्रोलिंग करीत असताना त्यांना एक बिगर नंबर प्लेटची हिरो होंडा फॅशन मोटार सायकलवर दोन २ मुले जातांना दिसल्याने त्यांनी त्या दोघांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ते विचारले असता त्यांचे नाव १. विधीसंघर्षीत बालक वय १४ वर्षे रा.धानोरी पुणे, २. विधीसंघर्षीत बालक वय १३ वर्षे रा. धानोरी पुणे असे सांगितले त्यांचेकडे असलेले हिरो होडा फॅशनला नंबर प्लेट का लावलेली नाही तिचा नंबर काय आहे? तिचे कागदपत्र कोठे आहेत याची विचारपुस केली असता ते उडवाउडवीचे उत्तरे देवु लागल्याने त्यांना ताब्यात घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुण् आणुन विश्वासात घेवुन तपास केला असता सदरची मोटार सायकल त्यांनी चोरी केलेली असल्याची कबुली दिलेली आहे. त्यांचेकडुन आणखिन होंडा ॲक्टीव्हा व होंडा सी डी १०० एसएस मोटार सायकल अशा दोन मोटार सायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे किं.रु.८५,०००/- ३ मोटार सायकली हस्तगत करुन गुन्हा रजि नंबर ६४/२०१९ भा.दं.वि कलम ३७९ व गुन्हा रजि नंबर १६०/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९ हे गुन्हे उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.